# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## // अंदाजपत्रकीय विशेष महासभा बैठकीचे कार्यवृत्त //

**सभा क्रं. - ४६** **दि. २१/०३/२०२३**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.२१/०३/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | चौधरी मनोज सुरेश | मराठे जितेंद्र भगवान |
| जोहरे प्रिया मधुकर | भोईटे लताबाई रणजीत | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर |
| पोकळे दिलीप बबनराव | पाटील चंद्रशेखर शिवाजी | पाटील रेखा चुडामण |
| सोनवणे कांचन विकास | कापसे मयुर चंद्रकांत | सोनवणे सुरेखा सुदाम |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | कापसे प्रतिभा चंद्रकांत | ढेकळे सदाशिव गणपत |
| शिंदे गायत्री उत्तम | देशमुख प्रतिभा गजानन | पाटील राजेंद्र झिपरु |
| बाविस्कर किशोर रमेश | पाटील विजय पुंडलिक | महाजन सुनिल सुपडू |
| सपकाळे मिना धुडकु | सोनवणे सुरेश माणिक | अत्तरदे रजनी प्रकाश |
| सपकाळे रंजना भरत | बारी शोभा दिनकर | आहुजा मनोज नारायणदास |
| कोल्हे प्रविण रामदास | शेख हसीनाबी शरिफ | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| सनकत चेतन गणेश | भिल पार्वताबाई दामु | खडके विश्वनाथ सुरेश |
| सोनवणे मुकुंदा भागवत | पाटील उषा संतोष | शेख सैईदा युसुफ |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | कोल्हे सिंधु विजय | पटेल इब्राहिम मुसा |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | बरडे नितीन मनोहर | सोनवणे विक्रम किसन |
| सोनवणे धीरज मुरलीधर | बेंडाळे उज्वला मोहन | भापसे जिजाबाई अण्णासाहेब |
| भोळे सिमा सुरेश | राणे गायत्री इंद्रजित | **स्विकृत सदस्य** |
| काळे दिपमाला मनोज | जोशी अनंत हरिश्चंद्र | विशाल राधेशाम त्रिपाठी |
| सोनवणे अश्विन शांताराम | तायडे सुरेखा नितीन | राजेंद्र नारायण मराठे |
| पाटील सचिन भिमराव | चव्हाण ज्योती बाळासाहेब | महेश रतन चौधरी |

सदर सभेस मा.आयुक्त, डॉ.विद्या गायकवाड, नगररचनाकार श्री.अशोक करवंदे, नगरसचिव तथा सहा.आयुक्त, श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त श्री.गणेश चाटे, उपायुक्त श्री.अभिजीत बाविस्कर, मुख्यलेखाधिकारी श्री.चंद्रकांत वानखेडे, सहा.आयुक्त(आरोग्य विभाग) श्री.उदय पाटील, शहर अभियंता, श्री.चंद्रकांत सोनगिरे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**मा.महापौर :-** नगरसचिव यांनी सभा कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** नमस्कार, सर्व सन्मा.सभागृहाचे स्वागत आहे. आजचा दिवस आपल्यासाठी खुप महत्वपुर्ण आहे. आनंदीय आहे, या २० व्या वर्धापन दिनानिमित्त आपल्याला सर्व सभागृहाला नम्रपणे खुप खुप शुभेच्छा. सर्व सन्मा.सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी वंदे मातरमसाठी उभे राहावे.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**सभेच्या सुरूवातीस वंदेमातरम ने सुरूवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता १) सन्मा.सदस्या चौधरी चेतना किशोर २) चौधरी मंगला संजय ३) सोनार रंजना विजय तसेच सन्मा.सदस्य ४) कोळी दत्तात्रय देवराम ५) काळे अमित पांडुरंग ६) कोल्हे ललित विजय ७) बालाणी भगतराम रावलमल ८) खडके सुनिल वामनराव ९) बागवान रियाज अहमद अब्दुल करीम यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी महोदया यांनी मंजूर केलेले आहेत. यानंतर आजच्या या वर्धापन दिनानिमित्त मा.महापौर महोदया यांना मी विनंती करतो की, त्यांनी या प्रसंगी निवेदन करावे ही विनंती.

**मा.महापौर :-** नमस्कार, दि.२१ मार्च २००३ या दिवशी नगरपालिकेचे महानगरपालिकेमध्ये रुपांतर झाले, आणि आज पुर्ण २० वर्ष पुर्ण होऊन या महानगरपालिकेचा २० वा वर्धापन दिन आपण साजरा करत आहोत. आणि विशेष म्हणजे याच दिवशी आपले अर्थसंकल्प /बजेट सुध्दा मा.आयुक्त मॅडम हे सादर करणार आहेत.त्यामुळे ही महासभा विशेष म्हटली जाणार आहे, २० वर्षाच्या कालखंडामध्ये बरेच उतार चढाव या महानगरपालिकेने पाहिलेले आहे. परंतु सर्व आपल्या महानगरपालिकेचे अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग, सन्मा.सदस्य नगरसेवक यांनी अतिशय धिटाईने म्हणा, किंवा त्यांच्या कर्तव्याने, हुशारीने या सगळयांवर मात करुन आपली महानगरपालिका ही कर्जमुक्त होऊन विशेष म्हणजे आता मला वाटते की, एक नविन पर्वाला सुरुवात होणार आहे. आणि २१ वे शतक म्हटले की, आपण म्हणतो की, एक विशेष विकासाची परवणी आपल्या महानगरपालिकेची नक्कीच सुरु होणार आहे. आणि त्यात विशेष म्हणजे. महानगरपालिकेला लाभलेल्या मा.आयुक्त मॅडम एक कर्तव्यदक्ष अधिकारी आपल्या महानगरपालिकेला लाभलेले आहे. महानगरपालिकेत कुठलेही कार्यक्रमाचे नियोजन आणि आयोजन असेल, तर एक महिला कर्मचारी जसे कुटुंबाचे नियोजन करते, कुठल्याही कार्यक्रमाचे नियोजन करते. तसेच महानगरपालिकेत काम करत असतांना प्रत्येक कामाचे नियोजन मॅडम हे करत असतात आणि जे मोठमोठे प्रश्न आहे त्यांनी मार्गी लावण्याचे प्रयत्न सुध्दा आपले कर्मचारी अधिकारी हे करीत आहेत. आपले सगळयांचे व नगरसेवकांच्या मदतीने आणि मला खात्री आहे नक्कीच येणारी वर्ष ही आपल्या जळगांव शहरासाठी सुखकारकच असणार आहे. कारण विकासाची कामे आता जवळपास सुरु झालेली आहे. अमृत आणि ड्रेनेज जरी हे जळगांव शहराचे आता दोन तीन वर्ष पहिलेचे वर्ष जर पाहु तर, भरपुर अडचणी येऊन जात आहे. पण मला माहित आहे एकदा हे रन आऊट झाल्यानंतर याचा चांगला रिझल्ट नागरीकांना सुध्दा मिळणार आहे. आणि केंद्राच्या राज्याच्या मदतीने उपक्रमाचे कार्यक्रम आहे. ते सुध्दा येत आहे. आणि त्याच्यामुळे नक्कीच जळगांव शहराचा विकास आपल्या सगळयांच्या मदतीने होणार आहे. मी पुनश्च एकदा सर्व अधिकारी कर्मचारी आणि सन्मा.नगरसेवक आणि जळगांव वासीयांना सुध्दा २० व्या वर्धापन दिनाच्या खुप खुप शुभेच्छा देते. धन्यवाद.

**नगरसचिव :-** मा.आयुक्त महोदया,

**मा.आयुक्त :-** नमस्कार, मॅडमांनी जसे सांगितले की, दि.२१ मार्च २००३ ते दि.२१ मार्च २०२३ या मध्ये आपल्या महापालिकेला स्थापनेपासुन ते आज २० वर्ष पुर्ण झालेले आहे. या काळातील मा.महापौर, मा.आमदार साहेब, मा.खासदार साहेब, मा.लोकप्रतिनिधी आणि संबंधीत जे अधिकारी कर्मचारी वर्ग लाभले त्या सर्वांचे यामध्ये योगदान आहे, मी जेव्हा पासुन जॉईंट झाली, तेव्हापासुन जळगांवचा सुवर्णकाळ मला सगळयांनी सांगितले आहे. हा सुवर्णकाळ पुन्हा एकदा आणण्यासाठी आपण सर्वांनी मिळुन घाईचा नसला तरी खारीचा वाटा तरी आपण उचलायलाच पाहिजे. अशी मी सर्वांकडुन अपेक्षा व्यक्त करते. आणि सर्वांना २० व्या वर्धापना दिनाच्या खुप खुप शुभेच्छा देते. धन्यवाद.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करण्यात येत आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** २० व्या वर्धापन दिनाच्या आपणास व सर्वांना शुभेच्छा की, आज जळगांव महानगरपालिकेचा २० वा वर्धापन दिन आहे. दि.२० मार्च २००३ ला आपली महापालिका झाली, त्यात मला दुसरा आनंद आहे की, त्या पहिल्या महापालिकेत मी निवडुन आलेलो होतो, आणि आज २० व्या वर्धापन दिनी सुध्दा मी निवडुन आलेलो आहे. मी सर्वांचे या ठिकाणी महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देतो, सर्व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देतो, विशेष करुन आपल्या महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, आपले पालकमंत्री श्री. गिरीष भाऊ त्यावेळेस होते, आपले गुलाबभाऊ जे आपले आज पालकमंत्री आहे. या सर्वांनी व गेल्या वर्षी या महानगरपालिकेला भरगोस निधी मिळवुन दिलेला आहे. त्याचेही या ठिकाणी अभिनंदन करतो, कारण यांच्या सर्वांच्या सहकार्यामुळे जसे आता महापौरताईंनी सांगितले की, आपली महानगरपालिका कर्जमुक्त झालेली, तर मला आनंद आहे दुसरा की, आपण २१ व्या वर्षाकडे पदार्पण करत आहोत, ज्या वेळेला एखादा बाळ मोठा होत जातो. आणि २१ व्या वर्षी तरुणाईकडे तो वळतो, त्याला आर्थिक देवाणघेवाण कळायला लागते, त्याच्यामुळे निश्चितच आपली महानगरपालिका २१ व्या वर्षात एक चांगले उत्पन्न महापालिकेला मिळेल, आणि आपण आपल्या ताकदीवरती या

शहराचे विकास करु याची मला या सभागृहामध्ये सांगण्याचे आनंद वाटतो, आपण सगळयांनी या पंच वार्षिक मध्ये सहकार्य केलेले आहे. त्याबद्दल आयुक्त मॅडम, जर बघितले आपण तर सगळी बॉडी, ७० ते ८०% बघितली तर ती तरुण बॉडी आहे या महापालिकेत. आयुक्त सुध्दा तरुण आहेत, महापौर ही अजुन तरुण आहेत. उपमहापौर आहेत, सभागृहनेते आहे, विरोधीपक्ष नेते आहेत, सर्व पदाधिकारी ही महानगरपालिका तरुणाच्या हातात आहे. ही तरुणाई अशीच कायम राहावी. आणि महापालिकेची प्रगती हो हीच शुभेच्छा या ठिकाणी देतो धन्यवाद,

**श्री.सुनिल महाजन, विरोधीपक्ष नेते :-** विशालभाऊ, गटनेते,

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हा गटनेते बंटीभाऊ तरुण आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** भाऊ, आमचे भगतभाई जवान नसल्यामुळे तुमचे नाव घेतलेले आहे.

**श्री.अनंत जोशी :-** दोन गटनेते तरुण आहे म्हणा, एक वयस्कर आहेत.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मग मी बोललो ना, तरुणाईचाच हा सभागृह आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, आयुक्त महोदया, उपमहापौर साहेब आणि सन्मा.सभागृह महानगरपालिकेच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त आपण सगळेच आनंदात आहोत. निश्चितच हा आनंद साजरा केलाच पाहिजे. बऱ्याच जणांनी, खुप छान मनोगत व्यक्त केले महापौरताईंनी, महापौरताईंनी सांगितले की, गेल्या काही काळापासुन आपण सगळेच अमृत आणि काही योजनांमुळे काही गोष्टी सफर करतो आहे. अर्थातच ताई. जेव्हाही शहर कात टाकतो, त्यावेळेला या वेदनांमधुन प्रत्येक शहराला जावे लागते. अगदी कोणत्याही जिवाचा नविन जन्म ज्या वेळेला होतो. त्या वेळेला मातेला ज्या प्रसव वेदना सहन करावे लागतात. त्यानंतरच एक गोंडस जिवाचा जन्म होतो. आणि त्याचा आनंद उत्सव साजरा करण्याचा आपल्या सगळयांना चान्स मिळत असतो. तसेच हे सगळे आहे. त्याच प्रोसेस मधुन आपण जातो आहे. निश्चितच २१ व्या वर्षात पदार्पण केल्यानंतर या सगळयांच्या स्वत: कडुन सुध्दा काही अपेक्षा असल्या पाहिजे. आता पर्यंत ही महापालिका म्हणुन नविन होती, महापालिका म्हणुन आपण शिकत होतो. या शिकण्याच्या प्रोसेस मध्ये काही चुकाही घडत गेल्या. पण येथुन कुठेतरी मागच्या चुकांची प्रवृत्ती टाळणे हे आपल्या सर्वांवरचे २१ व्या शतकातील जबाबदारीचा पहिला अहवान असणार आहे. तरुण महानगरपालिका, तरुण नगरसेवक, तरुण नेतृत्व अर्थातच हे युग तरुणाईचे आहे, तरुणाईनेच देशाचे नेतृत्व केले पाहिजे. सगळीकडे शेवटी, चैतन्य जे असतो हे तरुणांकडे असते, आणि जास्तीत जास्त चांगल्याचा ध्यास, हा असलाच पाहिजे. या सगळया शुभेच्छा या महापालिकेला असणारच आहे. सगळया प्रशासनाचे, कर्मचाऱ्यांचे, अधिकाऱ्यांचे, सगळया पदाधिकाऱ्यांचे २१ व्या वर्षात पदार्पण केल्या बद्दल अभिनंदन आहेच. पण त्याच वेळेला मला खेदाने हे सुध्दा नमुद करावे लागत आहे महापौरताई की, आपण आज २० वा वर्धापन दिन साजरा करत आहोत. बजेटची ही विशेष महासभा आहे. आणि लोकशाहीची गडचिप्पी स्थायी समितीच अस्तित्वात नसलेली ही महासभा आहे. तर हे सुध्दा आपण लक्षात घेतले पाहिजे. लोकशाहीची अशी थट्टा मला नाही वाटते की, दुसरीकडे कुठे झाली असेल. आणि हे सगळे यापुढे टाळणे आपली सर्वांचीच जबाबदारी आहे. पुन्हा एकदा २० व्या वर्धापन दिनाचे सगळयांना शुभेच्छा देते. आणि थांबते.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** मी, २००२ मध्ये आम्ही निवडुन आलो. तेव्हा नगरपालिका होती. मला दु:ख या गोष्टीचे आहे की, त्यावेळेला आमचा कार्यकाळ फक्त १८ महिन्याचा झाला, ते कार्यकाळ आम्ही पुर्ण करु शकलो नाही. परंतु खुशी या गोष्टीची होती की, माझा जो जळगांव होता तो महापालिकेत रुपांतर झाला. एक छोटासा वृक्ष होता तो आज मोठा झालेला आहे. आणि २० वर्ष त्या कार्यकाळाला झालेले आहे. तर मी सर्वांना शुभेच्छा देतो २० व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने. परंतु ज्यांनी हे स्वप्न बघितले जळगांवचे मा.सुरेशदादा जैन, त्यांचेही जे योगदान आहे ते विसरुन कामा नये. जसे जसे शहराचे परिवर्तन होत गेले, आपण सुखदुख सगळ बघितलेले आहे. मागच्या काळात जे घडले ते ही बघितले आहे. आम्ही जळगांवच्या विकासासाठी ज्या लोकांनी धडपड केली. ते जेलमध्ये ही म्हणजे आमचे जे जेष्ठ नगरसेवक म्हणा, नागरीक म्हणा, जेही जिम्मेदार होते. त्यांनी जेल मध्ये जाऊन ही भुगतलेले आहे. तेही योगदान आहे ते ही विसरायला नको. नविन फंड येत आहे. गुलाबभाऊ म्हणा, गिरीषभाऊ म्हणा ते ही जळगांवच्या विकासासाठी हातभार लावतील. ज्या कर्ज्याच्या ओझा खाली आपण २५ वर्षापासुन दबलेलो होतो. आज आपले ते नगरपालिकेवरती महानगरपालिकेवरती जे कर्ज होते, ते निल झालेला आहे. आणि आता आपण याच्यापेक्षा जास्त

प्रमाणे जळगांव शहराचा विकास करु. सगळयांच्या सोबतीने करु जळगांव शहराच्या विकासासाठी कोणतेही पक्षीय धोरण न अवलंबता, शहराच्या विकासाकडे लक्ष दिले तर बरं होईल. ऐवढे बोलुन मी सगळयांना शुभेच्छा देतो जय हिंद. जय महाराष्ट्र.

श्री.राजेंद्र पाटील :- याच्यामध्ये जसे गिरीषभाऊ असतील, देवेंद्रजी फडणवीस असेल, मा.गुलाबभाऊ आहे त्या प्रमाणेच राजुमामा भोळे आमदार यांचेही खुप मोठे योगदान आहे. त्याच्यासाठी मी मामांचे ही अभिनंदन करेल. आणि धन्यवाद देईल की, त्यांनी पाठपुरावा केला आणि आपली महापालिका कर्जमुक्त झाली. धन्यवाद.

**नगरसचिव -विषय क्र.१ :-** मुख्यलेखाधिकारी महानगरपालिका, जळगांव यांचेकडील संदर्भ क्र./जशमनपा/जा.क्र./लेखा/७०९/२०२३ दि.०८/०३/२०२३ अन्वये मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव यांचेकडुन मा.महासभेपुढे सादर होणारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०२२-२०२३ चे सुधारीत व सन २०२३-२०२४ चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण सादर करणे. मा.मुख्यलेखाधिकारी यांना मी या ठिकाणी आमंत्रित करतो की, त्यांनी मंचावर यावे.

**(मा.आयुक्त सो., यांचे हस्ते २०२३-२४ चा अर्थसंकल्प मा.महापौर महोदया यांना व मा.मुख्यलेखाधिकारी यांच्या हस्ते मा.उपमहापौर महोदय यांना सादर करण्यात आले. तसेच अर्थसंकल्प २०२३-२४ ची प्रत सभागृहात उपस्थित सर्व सन्मा.सदस्यांना बॅगमध्ये वितरीत करण्यात आली.)**

**नगरसचिव :-** अर्थ विभागाच्या स्टाफला विनंती करतो. सन्मा.सदस्यांना अर्थ संकल्पाची प्रत दिली गेली असल्यास त्यांनी तात्काळ बाजुला व्हायचे आहे. खात्री करायची आहे की, सन्मा.सदस्यांना प्रत दिली गेलेली आहे किंवा नाही. अनिल पाटील खात्री करा. मा.आयुक्त महोदया, या आजच्या अर्थसंकल्पावर त्यांचे निवेदन सादर करतील. मी सर्व स्टाफला विनंती करतो त्यांनी आपआपसात बोलु नये, मागच्या स्टाफला विनंती करतो, मा.आयुक्त महोदया, हे आजच्या अंदाजपत्रकावर मनोगत व्यक्त करतील, मी त्यांना विंनती करतो की, त्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करावे.

**मा.आयुक्त :-** सर्व सन्मा.सदस्यांना कॉपी मिळाली, निखील प्रिझेन्टेशन सुरु कर. मा.महापौर व सर्व सन्मा.सदस्य, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९५ अन्वये मी, जळगाव शहर महानगरपालिकेची आयुक्त म्हणुन सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाचे जमा व खर्चाचे सुधारीत व सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक सादर करीत आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार आयुक्त यांनी अर्थसंकल्प मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे.तथापी सद्यस्थितीत महानगरपालिकेत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सदरचा अर्थसंकल्प मा.महासभेस सादर करण्यात येत आहे.जळगाव शहर महाराष्ट्र राज्यातील अत्यंत झपाट्याने वाढणारे शहर असून, लोकसंख्या वाढीचा वेग व नागरीकरण विचारात घेता शहरातील नागरी सुविधांवर दिवसेंदिवस ताण वाढत आहे. या दृष्टीकोनातुन महानगरपालिकेचे अंदाजपत्रक एक महत्वाचा घटक असुन त्यामाध्यमातुन नागरिकांच्या सोई सुविधांच्या अपेक्षा पुर्ण करण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न असणार आहे. अंदाजपत्रक वास्तववादी, परिपूर्ण, लेखा सिध्दांतानुसार वर्गीकरण व परिणामकारक असणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.अंदाजपत्रकात तपशिलवार आर्थीक नियोजन व योजनांची माहिती असणे आवश्यक आहे.जळगांव शहरातील वाढत्या समस्या व पायाभूत सुविधेवरचा ताण विचारात घेता त्यावर मात करून उपाययोजना करण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. जळगांव महानगरपालिकेचे महसूली उत्पन्न व दायित्व पाहता अर्थसंकल्पीय अंदाज तयार करतांना किमान आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देणे हे मोठे आव्हान आहे.महानगरपालिकेच्या महसूली उत्पन्नाच्या वसुलीवर भर देऊन ते पूर्ण करावे लागणार असून प्रशासनास त्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाचा सुधारीत अर्थसंकल्प तयार करतांना उत्पन्नाच्या अतिशय सुक्ष्म बाबींचा विचार करून प्रत्यक्ष प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचा विचार करून जमे मध्ये कोणतीही अवाजवी वाढ न करता तसेच विभागांचा कामनिहाय आढावा, प्रलंबीत दायित्व व नव्याने प्राप्त प्रस्ताव व मंजुरी यांचा सविस्तर विचार करून उत्पन्न व खर्चाचा अंदाज करण्यात आलेला आहे.सन २०२३-२०२४ या आगामी

आर्थिक वर्षात अमृत पाणीपुरवठा योजना व मलनिस्सारणयोजनापुर्णत्वावर आहेत. या योजनांचे कार्यान्वयन करणे, अमृत २.० योजनेत मलनिस्सारण योजनेच्या उर्वरीत भागांचे व २४x७ पाणीपुरवठा करणेचे प्रकल्प तयार करून पुढील कामे करण्यांबाबत प्रशासनाचे नियोजन आहे. सर्व तक्रारी Online नोंदवीणे व त्यांचे तातडीने निराकरण करणे तसेच Digitalisation च्या माध्यमातुनसेवांची माहिती नागरीकांना देण्याचाप्रशासनाचा मानस आहे. जिल्हा नियोजन समितीचे माध्यमातुन नागरी दलितेत्तर वस्ती, सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान व नागरी दलितवस्ती सुधारणा या योजनांमधील सन २०२२-२०२३ मधील मंजुर झालेली निधींमधील कामे सन २०२३-२०२४ मध्ये पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. तसेच शासकीय योजनांचा प्राप्त होणाऱ्या निधीच्या अनुषंगाने देय मनपा हिस्स्यासाठी देखील स्वतंत्र एकत्रित तरतुद करण्यात आलेली आहे.सन २०२२-२०२३ चे सुधारीत व सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाचे मुळ अंर्थसंकल्पीय अंदाजखालील प्रमाणे-

## सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाचे सुधारीत अंदाजपत्रक

(रक्कम कोटीत)

| अ.क्र. | तपशिल | सन २०२२-२३ चे मुळ अंदाजपत्रक | सन २०२२-२३ चे सुधारीत अंदाजपत्रक |
|---|---|---|---|
| १. | **आरंभीची शिल्लक** | **२२३.९७** | **२४४.४७** |
| २. | महसुली जमा | ३३४.७७ | २४५.४४ |
| ३. | भांडवली जमा | ३१३.०१ | २२३.०३ |
| ४. | असाधारण देवघेव | ५८.३१ | ४३.४९ |
| ५. | परिवहन | ०.०० | ०.० |
| ६. | पाणीपुरवठा | ४२.०८ | ४२.५७ |
| ७. | मलनिस्सारण | ७.३२ | ३.३३ |
| | **एकुण** | **९७९.४६** | **८०२.३३** |
| ८. | महसुली खर्च | ३७३.०९ | २८२.५७ |
| ९. | भांडवली खर्च | ४६१.८३ | २६७.०९ |
| १०. | असाधारण देवघेव | ८०.१९ | ३७.६३ |
| ११. | परिवहन | ०.० | ०.० |
| १२. | पाणीपुरवठा | ४२.६५ | ४५.९० |
| १३. | मलनिस्सारण | ६.७५ | ०.० |
| १४. | **अखेर शिल्लक** | **१४.९५** | **१६९.१४** |
| | **एकुण** | **९७९.४६** | **८०२.३३** |

## सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाचे मुळअंदाजपत्रक

(रक्कम कोटीत)

| अ.क्र. | तपशिल | सन २०२३-२४ चे मुळ अंदाजपत्रक |
|---|---|---|
| १. | आरंभीची शिल्लक | १६९.१४ |
| २. | महसुली जमा | ३४२.०२ |
| ३. | भांडवली जमा | २४५.६५ |
| ४. | असाधारण देवघेव | ७१.४१ |
| ५. | परिवहन | ०.०० |

| | | |
|---|---|---|
| ६. | पाणीपुरवठा | ५०.७४ |
| ७. | मलनिस्सारण | ७.७९ |
| | **एकुण** | **८८६.७५** |
| ८. | महसुली खर्च | ३९१.६४ |
| ९. | भांडवली खर्च | ३१७.६५ |
| १०. | असाधारण देवघेव | ८४.६५ |
| ११. | परिवहन | ०.०० |
| १२. | पाणीपुरवठा | ५०.७४ |
| १३. | मलनिस्सारण | ७.७९ |
| १४. | अखेर शिल्लक | ३४.२८ |
| | **एकुण** | **८८६.७५** |

**१. मालमत्ता कर :-**

मागिल आर्थिक वर्षात शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण पुर्ण करण्यात आलेले असुन ज्या मालमत्तांचे सर्वेक्षण करणे बाकी आहे अश्या सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण पुर्ण करण्यांत येणार आहे. तसेच अधिनियमातील तरतुदीनुसार असलेले सक्तीच्या वसुलीबाबतचे सर्व अधिकार वापरुन मालमत्ता कराच्या वसुलीचे प्रमाण वाढविण्यात आलेले आहे. यापुढेही सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षामध्ये करवसुलीचे प्रमाण वाढविणेबाबत सर्व प्रभाग अधिकारी यांना सुचना देण्यात आलेल्या असुन वसुली उद्दीष्ट पुर्ण करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न राहणार आहे. सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात कर वसुलीत वाढ करण्यासाठी शहरातील मालमत्ताधारकांना थकीत मालमत्ताकरावर आकारण्यात आलेल्या शास्तीमधुन दिलासा मिळणेसाठी महानगरपालिकेमार्फत अभय योजना राबविण्यात आलेली असुन याचा बऱ्याच थकबाकीदारांनी लाभ घेतलेला आहे. सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात देखील उर्वरीत थकबाकीदारांकडुन जास्तीत जास्त वसुली करण्याचा प्रशासनामार्फत प्रयत्न करण्यात येणार आहे.

**२. दुकाने/ गाळा भाडे :-**

महापालिकेच्या स्वत:चे उत्पन्नापैकी व्यापारी संकुलातील गाळयांपासुन मिळणारे उत्पन्न ही प्रमुख बाब असुन यावर महापालिकेची आर्थिक स्थिती अवलंबुन आहे. गेल्या साधारण १०-१२ वर्षापासुन सदर विषय प्रलंबित असल्यामुळे मुदत संपलेल्या गाळयांची नुकसान भरपाईची रक्कम मोठ्या प्रमाणावर येणे असुन ती वसुली करण्याच्या संदर्भात महानगरपालिकेचा शासन दरबारी पाठपुरावा सुरू आहे.

३. **नगररचना विभाग :-**

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरीता नगररचना विभागासाठी रक्कम रु.१९.२७ कोटी इतके सुधारीत उत्पन्न अपेक्षित धरण्यात आलेले असुन सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात २४.१९ कोटी उत्पन्न अपेक्षित आहे. शासनाने एकात्मीक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली जाहीर केलेली

असुन त्यानुसार अनुज्ञेय FSI मध्ये वाढ करण्यात आली आहे.तसेच छोट्या भुखंडावरील बांधकाम परवानगीची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात आलेली आहे. सुधारीत नियमावलीमुळे गृह प्रकल्पांना अधिक चालना मिळुन नागरीकांना किफायतशिर किमती मध्ये घरे उपलब्ध होण्याचे प्रमाण वाढणार आहे तसेच या सर्व प्रक्रियेमुळे महानगरपालिकेतसुध्दा या विभागापासुन मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये वाढ अपेक्षित आहे.

**४. पाणीपुरवठा :-**

पाणीपुरवठा आकारापासुन सन २०२२-२३ या वर्षासाठी रक्कम रु.२१.८९ कोटी इतके सुधारीत उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले असुन सन २०२३-२४ या वर्षामध्ये रक्कम रु.३१.९० कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे.नजिकच्या काळात सध्या सुरू असलेले अमृत योजने अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे काम पुर्ण होणार आहे. जुन्या पाणीपुरवठा वाहीन्यांवरील नळ कनेक्शन नविन पाईपलाईन वर जोडुन देण्यात येत आहे.जे कनेक्शन अधिकृत आहेत असेच कनेक्शन नविन पाईप लाईनवर जोडुन देण्यात येत असल्यामुळे अनधिकृत नळ कनेक्शन बंद होणार आहे.त्यामुळे यापासुन होणारे मनपाचे नुकसान टळणार आहे. अनधिकृत नळ कनेक्शन असणाऱ्यांना महानगरपालिकेकडे रितसर मागणी करून नविन नळ कनेक्शन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे त्यामुळे अधिकृत कनेक्शनची संख्या वाढुन पाणीपट्टी पासुन मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये वाढ होणार आहे. पाणीपट्टी हे वसुलीचे माध्यम नाही परंतु किमान पाणीपुरवठ्याचा खर्च पाणीपट्टी वसुलीतुन पुर्ण केला जाईल याचे नियोजन केलेले आहे.

**५. मलनिस्सारण :-**

सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात मलनिस्सारण योजना पुर्णपणे कार्यन्वीत होणार असुन या अंतर्गत मलप्रक्रिया प्रकल्प (STP)कार्यान्वीत होईल. त्याचप्रमाणे (STP) कार्यान्वीत झाल्यानंतर प्रत्येक घराचे शौचालय व सांडपाणी कनेक्शन या योजनेच्या प्रापॅटी चेंबरला जोडण्यात येणार आहे. मलनिस्सारण योजना कार्यान्वीत झाल्यानंतर या योजनेच्या कार्यान्वयन तसेच देखभाल व दूरूस्ती या खर्चासाठी अधिनियमातील तरतुदी नुसार मलप्रवाहकर लागु करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करून मलप्रवाह कर नव्याने लागु करण्यात येईल तसेच शौचालय व सांडपाणी कनेक्शन जोडणीसाठी नागरीकांना परवानगी देत असतांना त्यासाठी जोडणी शुल्काची आकारणी करण्यात येईल. मलप्रवाह कर लागु करणे तसेच जोडणी शुल्क आकारणी करणे यासाठी योग्य वेळी स्वतंत्र प्रस्ताव महासभेत सादर करण्यात येईल.

**६. घरकुल :-**

गेंदालाल मिल, शिवाजी नगर, वाल्मीक नगर, खेडी, पिंप्राळा जुने व नविन, येथे घरकुले बांधकाम करून हस्तांतरीत करण्यात आलेले आहे.प्रत्येक घरकुल धारकाकडुन सर्व सोईसुविधा पुरविणेकामी त्यांचे मार्फत दररोज रु.५ या प्रमाणे सेवाशुल्क आकारण्यात येत आहे.परंतु सदर रक्कम

घरकुलधारक भरणा करीत नाही.त्यामुळे सेवाशुल्काची थकबाकी १७ कोटी इतकी आहे.नोव्हेंबर २०२२ अखेर रु.४.६१ लक्ष मात्र अल्प वसुली झालेली असुन, सदर थकबाकी वसुलीसाठी महानगरपालिकेस परिणामकारक उपाययोजनेचा अवलंब करणे क्रमप्राप्त आहे.यासाठी सदर वसुलीची जबाबदारी संबंधीत प्रभाग समिती कार्यालयाकडे सोपविण्यात आलेली आहे.यासाठी अतिरीक्त कर्मचारी उपलब्ध करुन देवून वसुलीच्या कामास गती देणे आवश्यक आहे.तसेच याकामी सन्मा.सदस्यांचे सहकार्य देखील अपेक्षित आहे.

**७. सर्वांसाठी घर योजना :-**

प्रधान मंत्री आवास योजनेच्या अंतर्गत स्व:मालकीच्या जमिनीवर घरकुल बांधण्यासाठी शासनामार्फत प्रती लाभार्थी २.५० लक्ष अनुदान देण्यात येते, या अंतर्गत मनपा मार्फत १० DPR मंजुर आहेत व ११७१ लाभार्थीचे प्रस्ताव मंजुर असुन २०० घरकुलांचे काम पुर्ण आहे. व १७० घरांचे बांधकाम सुरू आहे.या योजनेला गती देण्यासाठी मनपा मार्फत ०३ दिवसांचा कँम्पचे आयोजन करण्यात येत आहे.जास्तीत जास्त लाभार्थ्यांना घरकुल चा लाभ देण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे.

**८. घनकचरा व्यवस्थापन :-**

महानगरपालिकेस केंद्र व राज्य शासनाचे अनुदान योजने अंतर्गत रक्कम रु.४९ कोटी रुपयांचा सुधारीत घनकचरा प्रकल्प मंजुर झाला आहे.या अंतर्गत सध्या आव्हाणे शिवार येथील कचरा डेपोवरील पुर्वीच्या कचऱ्यावर बायोमाईनिंगची प्रक्रिया पुर्ण करून काही प्रमाणात जागा कचरामुक्त करण्यात आलेली आहे.तथापी अद्यापही तेथे कचरा प्रक्रियेआभावी तथे कचरा साठला आहे.उर्वरीत कचऱ्यावर प्रक्रिया पुर्ण करून जागा मोकळी झाल्यानंतर त्याच जागेवर नव्याने येणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्पाचे काम सुरू करणे प्रस्तावीत आहे.

**९. विद्युत विभाग :-**

शहरातील जुन्या तांत्रीक प्रणालीचे १५४५७ पथदिवे निष्कासीत करून त्याजागी ई ई एस एल एजन्सी मार्फत एस्को तत्वावर एल.ई.डी. दिवे बसविण्याचा उपक्रम राबविण्यात येऊन १७७५२ एल ई डी पथदिवे बसविण्यात आलेले असुन एजन्सी मार्फत देखभाल दुरूस्ती करण्यात येणार आहे त्यासाठी सन २०२३-२४ चा अंदाजपत्रकात रू.२ कोटी मात्रची तरतुद करण्यात आलेली आहे. उपक्रम राबविल्याने ५०% विज बचत होणार असुन महापालिकेचा विज देयक वरील खर्च देखील कमी होणार आहे.

तसेच नविन वाढीव परीसरात सुध्दा एलईडी पथदिवे बसविण्याचे प्रस्तावीत आहे त्यासाठी सन २०२३-२४ चे मुळ अंदाजपत्रकात रू.१.५० कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे.

शहरातील चौकात जुने वाहतुक नियंत्रण व्यवस्था निष्कासीत करून त्याजागी सौरऊर्जेवरील नविन तांत्रीक प्रणालीचे टायमरसह स्वयंचलीत वाहतुक नियंत्रण व्यवस्थेचे काम करण्यात येणार असून

त्याकामी देखील सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकात रू.१ कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच महानगरपालिका प्रशासकीय इमारतीवर सौर उर्जा प्रकल्प व इलेक्ट्रीक चार्जींग स्टेशन उभारणेकामी रु.१ कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे.

**१०. समाज विकास विभाग :-**

a. **महिला व बालकल्याण विभाग :-** या विभागसाठी सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकात रु. २ कोटी मात्रची तरतुद सुचविण्यात आली आहे. महिला व बालकल्याण विभागामार्फत शिक्षीका, मदतनिस यांना मानधन देणे, विद्यार्थ्यांना पोषण आहार, शिष्यवृत्ती, पुस्तके वाटप करणे त्याचप्रमाणे महिलांची वैद्यकीय तपासणी करणे, त्यांना विविध विषयांचे प्रशिक्षण देणे, महिला बचतगटांसाठी महोत्सव/ महिला मेळावा/ आरोग्य शिबिर इत्यादी कार्यक्रम हाती घेऊन महिला व बालकल्याण विभागासाठी अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या तरतुदीतुन खर्च करणेबाबत नियोजन आहे. महिला महोत्सावास सुमारे २ ते ३ लाख नागरीक भेट देत असुन त्यामध्ये बचतगटांमार्फत लावण्यात आलेल्या स्टॉल्सवर उत्पादीत वस्तुंची विक्री होवुन महिलाचे आर्थिक सबळीकरण होते.

b. **दिव्यांग कल्याण निधी :-** दिव्यांग कल्याण योजनांसाठी रु. २ कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

   मा. महासभेने मान्यता प्रदान केलेल्या महिला व बालकल्याण विभागाच्या १५ योजनांची व दिव्यांग कल्याणासाठीच्या ११ योजनांची महानगरपालिकेमार्फत सन २०२३-२४ मध्ये देखील अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

c. **आर्थिक व दुर्बल घटक :-** शहरातील आर्थिक व दुर्बल घटकातील नागरीकांसाठी स्वतंत्रपणे रु.२ कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

***वृक्ष प्राधीकरण निधी***

शहरात पर्यावरण सुधारणा व नविन झाडे लावणेकामी सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात रु. ६० लक्ष मात्रची तरतुद करण्यात आलेली आहे.

***रस्ते व्यवस्था व दुरूस्ती व नविन रस्ते***

सन २०२३- २०२४ या आर्थिक वर्षात रस्ते व्यवस्था व दुरूस्तीसाठी रु. ३.४० कोटी व नविन रस्ते तयार करणेकामी महसुली उत्पन्नातुन रु. ८.०० कोटी मात्रची तरतुद करण्यात आलेली आहे.

**गटार व्यवस्था व दुरूस्ती व नविन गटारी**

सन २०२३- २०२४ या आर्थिक वर्षात गटार व्यवस्था व दुरूस्तीसाठी रु. २.०० कोटी व नविन गटार तयार करणेकामी महसुली उत्पन्नातुन रु.३.०० कोटी मात्रची तरतुद करण्यात आलेली आहे.

**सार्वजनिक उद्यान व्यवस्था व दुरूस्ती व नविन बगिचे**

सन २०२३- २०२४ या आर्थिक वर्षात सार्वजनिक उद्यान व्यवस्था व दुरूस्तीसाठी रु. २.०० कोटी व नविन बगिचे तयार करणेकामी महसुली उत्पन्नातुन रु.१.०० कोटी मात्रची तरतुद करण्यात आलेली आहे.

**<u>कर्मचारी प्रशिक्षण</u>**

जळगाव शहर महानगरपाकिलेचा सुधारीत आकृतीबंध मंजुर झालेला असल्याने मनुष्यबळ बळकटी करणासाठी व प्रशासकीय दृष्या कामकाज अधिक कार्यक्षमपणे होणाच्या दृष्टीकोनातुन कार्यरत व नविन येणाऱ्या कर्मचारी वृंदास प्रशिक्षणासाठी रु.८० लक्ष मात्रची तरतुद करण्यात आलेली आहे.

**सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात ज्या महसूली व भांडवली महत्वाच्या बाबींवर खर्चाची तरतुद करण्यात आलेली आहे त्या खालील प्रमाणे-**

विद्युत विभागा अंतर्गत LED पथदिवे लावणे/ सौरउर्जा संवर्धन प्रकल्प/ चार्जिंग स्टेशनकामी रु.४.५० कोटी
दवाखाने विभागासाठी औषध खरेदी / उपकरणे , श्वान दंश लस :- रु.४८ लक्ष
साथिचे रोग/ मलेरीया /संसर्गजन्य रोग प्रतिबंधक उपाययोजनेकामी औषधी व उपकरणे खरेदी :- रु.८० लक्ष
बालगंधर्व खुले नाट्यगृह व्यवस्था व दुरूस्ती :- रु. १० लक्ष
सार्वजनीक उद्याने व्यवस्था व दुरूस्ती :- रु.२ कोटी
प्रशासकीय इमारत व्यवस्था व दुरूस्ती :- रु.१ कोटी
रस्ता व्यवस्था व दूरूस्ती :- रु.३.४० कोटी
गटार व्यवस्था व दूरूस्ती :- रु.२ कोटी
पुतळे व्यवस्था व दूरूस्ती :- रु.२ कोटी
शहरात दिशा दर्शक फलक लावणे :- रु.२५ लक्ष
क्रिडा स्पर्धा / महापौर चषक :- रु.६३ लक्ष
पर्यावरण सुधारणा व नविन झाडे लावणे :- रु.६० लक्ष
आपत्ती व्यवस्थापन निवारण :- रु.३९ लक्ष
डिजीटल शाळा करणे व ग्रंथालय विकास :- रु.२७ लक्ष
नगरसेवक व पदाधिकारी प्रशिक्षण :- रु.२५ लक्ष
नगरसेवक स्वेच्छा निधी :- रु. २.७६ लक्ष
प्रभाग विकास निधी :- रु. ५.१३ लक्ष
कर्मचारी प्रशिक्षण खर्च :- रु.८० लक्ष
कर्मचारी वर्ग यांना ७ वा वेतन आयोग फरक :- रु. १० कोटी
निवृत्ती वेतनधारक ७ वा वेतन आयोग फरक :- रु.१ कोटी
नविन गटारी :- रु.३ कोटी
नविन बगीचे :- रु.१ कोटी
फायर स्टेशन बांधणे :- ५० लक्ष
नविन रस्ते :- रु. ८ कोटी
नविन वाहन खरेदी :- रु.२ कोटी
ई गव्हर्नंस साहित्य व व्यवस्थापन :- रु.१ कोटी
भुसंपादन मोबदला :- रु. १६ कोटी
नविन पुतळे उभारणे :- रु. २ कोटी
नविन विद्युत पोल उभारणे / विज वाहीनी स्थलांतर :- रु.२ कोटी
नविन स्मशान भुमी व विद्युत दाहीनी :- रु.१.५० कोटी
नविन लाईट व्यवस्था बसविणे :- रु. ७५ लक्ष
पाणी शुध्दीकरणासाठी :- रु.२.०५ कोटी
नविन पाईप लाईन व्यवस्था व दुरूस्ती :- रु.२.१० कोटी

शासन अनुदानीत योजनांकामी मनपा हिस्सा :- रु. ५०.१० कोटी
पाणीपुरवठा योजनेकामी मनपा अनुदान :- रु.१८.८३ कोटी

भारताचे मा.पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखालील स्वच्छ भारत मिशन, अमृत योजना, पंतप्रधान आवास योजना, १५ वा वित्त आयोग आणि अन्य योजनांच्या माध्यमातून जळगाव शहराच्या विकासाला चालना देण्यासाठी जे योगदान दिलेले आहे. त्याबद्दल त्यांचे कृतज्ञपुर्वक आभार मानते.

महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री नामदार श्री.एकनाथरावजी शिंदे, मा.उपमुख्यमंत्री नामदार श्री.देवेंद्रजी फडणवीस, जळगाव जिल्ह्याचे मा.पालकमंत्री नामदार श्री.गुलाबरावजी पाटील, मा.मंत्री महोदय नामदार श्री.गिरीषजी महाजन, तसेच मा.खासदार श्री.उन्मेशजी पाटील व मा.आमदार श्री. सुरेशजी उर्फ राजुमामा भोळे व विधानसभा / विधानपरिषदेचे सन्माननीय सदस्य यांनी जळगाव महानगरपालिकेस वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचेही मन:पुर्वक आभार व्यक्त करते.

तसेच जळगाव शहर महानगरपालिकेच्या माध्यमातून जळगाव शहरातील नागरिकांच्या दैनंदिन अडीअडचणी दुर करून त्यांना जास्तीत जास्त चांगल्या दर्जाच्या सेवा व सुविधा उपलब्ध करून देण्याच्या निर्णय प्रक्रीयेत व विकास कामांच्या संदर्भात प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये प्रशासनास वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शन करीत असलेल्या मा.महापौर सौ. जयश्रीताई महाजन, मा.उपमहापौर श्री.कुलभुषणभाऊ पाटील, मा.विरोधी पक्षनेते श्री.सुनिलभाऊ महाजन,मा. सभागृह नेते श्री. ललीतभाऊ कोल्हे, सर्व पक्षीय सन्माननीय गटनेते, सन्माननीय सभापती प्रभाग समिती १ ते ४ व सर्व सन्माननीय सदस्य यांचे देखील मन:पुर्वक आभार व्यक्त करते.

जळगाव शहरातील सर्व वृत्तपत्र व वृत्तवाहिन्यांचे पत्रकार, प्रतिनिधी व वार्ताहर यांनी महानगरपालिकेच्या विविध योजनांना, धोरणांना सातत्याने सकारात्मक प्रसिध्दी देवून सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे देखील विशेष आभार व्यक्त करते.

तसेच सदर अंदाजपत्रक तयार करणेसाठी व महापालिकेचे कामकाज करीत असलेले उपायुक्त, सहा. आयुक्त, महानगरपालिकेतील सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद यांचे सुध्दा मी आभार व्यक्त करते.

जळगाव शहरातील नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवा व सुविधांमध्ये गुणात्मक तसेच संख्यात्मक वाढ करण्याचे मोठे आवाहन सध्या महानगरपालिकेसमोर आहे. महानगरपालिकेकडेस उपलब्ध असलेले अपूरे मनुष्यबळ तसेच मर्यादीत आर्थिक क्षमता याचा समतोल साधुन पुढील आर्थिक वर्षामध्ये शहरातील नागरिकांना अधिकाअधिक चांगल्या प्रकारे सेवा व सुविधा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न महानगरपालिकेमार्फत करण्याचा संकल्प आहे. यासाठी सादर केलेले अंदाजपत्रक योग्य विचारविनिमय करून अंतिम मान्यतेसाठी मा.महासभेस सविनय सादर करीत आहे.

धन्यवाद जयभिम " जय हिंद" जय महाराष्ट्र.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आयुक्त मॅडम यांनी जळगांव शहर महानगरपालिकेचा अर्थसंकल्प आपणास सादर केलेला आहे. अर्थसंकल्पाच्या वरुन खालील बाबी आमच्या नजरे खालुन काढलेल्या आहे.परंतु या संदर्भातल्या काही बाबींमध्ये तरतुदी कमी किंवा जास्त करण्याच्या दृष्टीकोणातुन आणि अर्थसंकल्पाचा विस्तृतपणे अभ्यास करण्याच्या अनुषंगाने ही सभा तहकुब करण्यात यावी आणि अर्थसंकल्पाचा सखोल अभ्यास करुन पुढील महासभेमध्ये अर्थसंकल्प आपण सादर करु या. तारीख ठरवुन द्या. ३१ मार्च करुन टाका.

**मा.महापौर :-** ३१ मार्च नाही तर त्याच्या अगोदर करु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विशेष महासभा राहील ती म्हणजे ३ दिवसाची नोटीस देऊन ही काढता येईल. २९ किंवा ३१.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ, ३१ मार्च बरोबर आहे. कारण २३ ला अजेंडा काढावा लागणार.

**मा.आयुक्त :-** ३१ ला मार्च एन्डचे कामे असतात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जर कधी नियोजन करुन २९ ही बसत असेल तर काही हरकत नाही. रेग्युलर महासभा जर घ्यायची ना, त्याचे ही काही प्रस्ताव आले असतील ना, तर ती ही विशेष महासभा घेऊन टाका. म्हणजे अर्थसंकल्पाची एक होऊन जाईल आणि दुसरे काही आले असतील ना विषय तर त्याची ही विशेष महासभा घेऊन टाका.

**नगरसचिव :-** तिला ७ दिवसाचे गॅप पाहिजे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** आहे ना ७ दिवस बसत आहे ना.

**नगरसचिव :-** ३१ ला बसते.

**ॲड.शुचिता हाडा :-** २९ ची बजेटची घेऊन टाका आणि जी रेग्युलरची आहे त्याच्या पुढची तारीख मध्ये घेऊन टाका. असे पण २ सभा घ्याव्याच लागणार आहे. ११ ला एक आणि १२ ला एक. आणि बजेटची जी महासभा असेल ती ११ ला सुरु झाली आणि १२ ला संपली असे होईलच तसे काही नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** २ महासभा घेतल्याने चहा पाण्याचा खर्च वाढतो.

**ॲड.शुचिता हाडा :-** नाही घेऊ आपण चहा, पाणी, आपण तसे प्रशासनाला सांगु. ३१ मार्चला सगळयांचे मार्च एन्डचे कामे असतात.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** त्याला सुध्दा समजा समिती बनवायची गरज पडली.तर ते सुध्दा धोरण लक्षात ठेवुन एक दोन तीन दिवस मागे पुढे जरी झाले तर ते प्रस्ताव तुम्हाला त्याच्यात घेता येईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** कार्योत्तर मंजुरी द्यायला पाहिजे मग त्या कामांना.

**ॲड.शुचिता हाडा :-** बजेटची सभा महापौरताई,३१ मार्चला मार्च एन्ड प्रत्येक सदस्याचे सुध्दा काही वयक्तीक कामे असु शकतात. बँकांच्या व्यवहाराची पुर्तता असते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई, ३१ मार्चला ही सभा घेणे बंधनकारक नाही. समजा, स्थायीने आज जर कधी,

**ॲड.शुचिता हाडा :-** ३१ मार्चला जर आपण सभा नाही घेतली तर प्रशासनाचा तो बजेट तसाचा तसा कॅरीफॉरवर्ड होतो. तो मंजुरच होईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण बजेटमध्ये कितीही बदल केले ना. वही होता है जो मंजुरे खुदा होता है. जे प्रशासनाला करायचे आहे तेवढाच बजेट मंजुर होतो.

**ॲड.शुचिता हाडा :-** पण, उम्मीद पे दुनिया कायम है. आपल्याला जे प्रयत्न करायचे आहे ते आपण करतच राहायचे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपल्या मनाच्या समाधानासाठी आपण तरतुदी बदलत असतो. बघा जी काही ठरवायची असेल. सगळयांच्या सोईनुसार तारीख.

**ॲड.शुचिता हाडा :-** जर काही सदस्यांचे कामे असतील मार्च एन्डींगमुळे तर २९ बजेटची करु. आणि दुसरी जी काढायची आहे. नगरसचिव साहेबांचे म्हणणे आहे की, त्याला ७ दिवसाची क्लियर मुदत लागेल. मग ती ३१ लाच निघु शकणार २३ ला अजंडा काढला तर.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मग १ च्या नंतर घ्या ना मग.

**ॲड.शुचिता हाडा :-** १ नंतर करु. त्याची घाई न करता ती १-२ दिवस मागे पुढे घेऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जनरल बॉडीची मिटींग काढण्याच्या मागचा हेतु काय आहे. काही कामे जे आलेले आहे. फक्त संविदांना मान्यता देण्यासाठी विलंब होत आहे. तर ते कसे आहे कार्योत्तर मान्यतेच्या अधिन राहुन प्रशासनाने तश्या मंजुऱ्या देणे आवश्यक आहे.

**मा.आयुक्त :-** सर इस्टीमेटेड कॉस्टच्या आबाऊ असल्यामुळे आपल्याला मान्यता घ्यावी लागेल, कार्योत्तर साठी सगळे ओके असले तर मला हरकत नाही.

**ॲड.दिलीप पोकळे :-** कार्योत्तर मान्यता द्यावी लागेल. वेळ कमी आहे.

**मा.आयुक्त :-** दर मागविण्याचे प्रस्ताव आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे विकास कामांना उशीर होणार नाही.

**श्री.नितीन बरडे :-** २९ घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** २९ ला बजेटची घ्या आणि जनरल १ तारखेनंतर घ्या. ताई बजेटची २९ ला घ्यायची असेल तर २९ ला घ्या. आणि जनरल महासभा जी आहे ती १ तारखेनंतर घ्या.

**मा.महापौर :-** मा.आयुक्त मॅडम यांनी मांडलेला हा विस्तृत अर्थसंकल्प आपल्या सगळयांना अभ्यासास्तव दिलेला आहे. परंतु सदस्यांनी केलेल्या मागणीनुसार त्याचा सखोल अभ्यास व्हावा म्हणुन ही महासभा २९ मार्च सकाळी ११.०० वाजेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे. सभा २९ मार्च सकाळी ११.०० वाजता घेण्यात यावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १००४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, मुख्यलेखाधिकारी महानगरपालिका, जळगांव यांचेकडील संदर्भ क्र./जशमनपा/जा.क्र./लेखा/७०९/२०२३ दि.०८/०३/२०२३ अन्वये मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव यांचेकडुन मा.महासभेपुढे सादर होणारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०२२-२०२३ चे सुधारीत व सन २०२३-२०२४ चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण व निवेदन महासभेपूढे सादर करण्यात आलेले असुन अंदाजपत्रकातील जमा आणि खर्चाच्या प्रत्येक बाबींवर अभ्यास करणे तसेच विचार विनिमय करणेसाठी सदर सभा दि.२९/०३/२०२३ रोजी सकाळी- ११.०० वाजेपर्यंत तहकुब करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**सही/-**
**(महाजन जयश्री सुनिल)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**